क्र.मप्राशिप/सशि/खशा/हाऊस किपिंग/२०२०-२१/१०० दि.१३/०१/२०२१

प्रति,

..............................................................

..............................................................

विषय: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयातील
दैनंदिन साफसफाई करण्यासाठी व कार्यालयाची
निगा राखणे या कामी दरपत्रके सादर करणेबाबत.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४ या कार्यालयातील दैनंदिन साफसफाईकरिता १ वर्षाच्या कालावधीकरिता सेवाकरार करणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयांतर्गत तळमजल्याच्या जिन्यालगतचा परिसर, पहिला मजला, दुसरा मजला व सभोवतालच्या परिसरातील आणि बालभवन येथील पहिल्या मजल्यावरील माध्यमिक विभागातील कार्यालयातील दैनंदिन साफसफाईच्या चटई क्षेत्रफळाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ) | | |
|---|---|---|
| क्र. | तपशील | चटई क्षेत्रफळ (Carpet Area) चौ.मी. |
| १ | महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय (जवाहर बालभवन, पहिला मजला) | ६०१.७२ |
| २ | माध्यमिक विभाग (जवाहर बालभवन, दुसरा मजला) | १४८.३७ |
| ३ | माध्यमिक विभाग (बालभवन, पहिला मजला) | ७५.३५ |
| ४ | जवाहर बालभवन इमारतीवरील छत | ६५६.५३ |
| क्र. | तपशील | चटई क्षेत्रफळ (Carpet Area) चौ.मी. |
| ५ | तळमजल्यावरील जिन्यालगतचा परिसर | ९९.३३ |

| | | |
|---|---|---|
| ६ | स्वच्छतागृहे (एकूण १८) (जवाहर बालभवन येथील पहिला मजला व दुसरा मजला, तसेच बालभवन येथील पहिल्या मजल्यावरील) | ६०.०६ |
| ७ | इमारतीच्या सभोवताचा परिसर (५ मीटर) रूंदी | ७८९.५६ |
| | **एकूण** | **२४३०.९२** |

वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे (चटईक्षेत्रफळातील) या कार्यालयातील दैनंदिन साफसफाईकरिता साफसफाई साहित्यासह ३ पूर्णवेळ व ३ अर्धवेळ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याबाबत आपले दर पुढील तक्त्याप्रमाणे सादर करावेत.

| ब) | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्र.** | **तपशील** | **संख्या** | **कर्मचाऱ्यांच्या कामाचे तास** | **साफसफाई साहित्यासह एकूण सहा कर्मचाऱ्यांच्या वेतन व इतर प्रशासकीय खर्चाचा समावेशासह प्रतिमहिना दर रू. (सर्व करांसहित)** |
| १ | पूर्णवेळ कर्मचारी | ३ | सकाळी ९.०० ते संध्याकाळी ०६.०० | |
| २ | अर्धवेळ कर्मचारी | ३ | सकाळी ०७.०० ते दुपारी १२.०० | |

सदर सेवाकराराबाबतच्या इतर अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. सदर सेवाकरारांतर्गत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ता इत्यादी बाबतची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय याबाबत जबाबदार राहणार नाही.

२. पुरवठादारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासंबंधी Minimum Wages Act, Employees Provident Act, Employees Insurance Act मधील इतर कायदे, नियम इ. तरतुदींचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय याबाबत जबाबदार राहणार नाही.

३. पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्र व गणवेश देण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४. पुरवठादारामार्फत पुरविण्यात येणारे सफाईगार कर्मचाऱ्यांचे दि.३१/१०/२०२० रोजी वय ५० वर्षांपेक्षा जास्त नसावे व १८ वर्षांपेक्षा कमी नसावे.

५. सफाईगार कर्मचारी हा निर्व्यसनी असावा. तसेच त्यास मराठी व हिंदी भाषा अवगत असावी.

६. पुरवठादारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सफाईगार कर्मचाऱ्याची वैयक्तिक माहिती पुरविणे आवश्यक राहील. उदा.शैक्षणिक अर्हता, कायम व सध्याचा पत्ता, अलिकडे काढलेले पासपोर्ट साईज फोटो.

७. सफाईगार कर्मचाऱ्यांची कार्यालयातील साफसफाईबाबत कामाचे स्वरूप (Scope of Work) सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार सफाईगार कर्मचाऱ्यास कार्यालयातील साफसफाईची कामे पार पाडणे आवश्यक राहील.

८. पुरवठादारास दरमहा मासिकरित्या देयके सादर करावी लागणार आहेत. सदर मासिक देयकातून नियमानुसार TDS (IT+GST) व इतर करांची रक्कम कपात करून देयके अदा करण्यात येतील.

९. पुरवठादारांनी त्यांचे मासिक दर सादर करताना कर्मचाऱ्यांचे वेतन, साफसफाई साहित्यांचा खर्च (उदा.झाडू, डांबर गोळ्या, फिनेल व इतर साफसफाईचे साहित्य) प्रशासकीय खर्च इ. बाबींचा विचारात घेऊन सर्व करांसहित त्यांचा मासिक दर सादर करण्यात यावा.

१०. पुरवठादार त्यांचे दर सादर करण्यापूर्वी सदर पत्रात तक्ता-अ मध्ये नमूद केलेले चटई क्षेत्रफळ आणि कार्यालयातील परिसराची पाहणी करू शकतात.

११. पुरवठादाराने त्यांच्या दरपत्रकासोबत पुढीलप्रमाणे नमूद केलेली कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

a) दुकाने व आस्थापना नोंदणीचे प्रमाणत्राची पत्र.
b) पी.एफ. (P.F.) नोंदणीची प्रत.
c) ई.एस.आय.सी. (ESIC) रजिस्ट्रेशनची प्रत.
d) जीएसटी रजिस्ट्रेशनची प्रत (वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास).
e) वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा कमी असल्यास सेल्फ डिक्लरेशनचे पत्र.

f) मागील ३ वर्षांच्या वार्षिक उलाढालीबाबतचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०).सन २०१९-२० चे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास Provisional Balance sheet सादर करावे.

g) पॅन कार्डची प्रत.

१२. पुरवठादारास दरपत्रकासोबत इसारा रकमेपोटी (EMD) रू.१९,४४०/- इतक्या रकमेचा - समग्र शिक्षा, मुंबई या नावाने कोणताही राष्ट्रीयकृत किंवा शेड्यूल कमर्शिअल बँकेवर काढलेला (Payable at Mumbai) चा धनाकर्ष सादर करणे आवश्यक राहील.

१३. निवड झालेल्या पुरवठादास सेवाकराराच्या एकूण रकमेच्या ५% प्रमाणे अनामत रक्कम (Security Deposit) सादर करणे बंधनकारक राहील.

१४. पात्र ठरलेल्या पुरवठादाराची इसारा रक्कम (EMD) त्यांच्याकडून अनामत सुरक्षा रक्कम (Security Deposit) सादर केल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल. तसेच अपात्र असलेल्या (Unsuccessful) पुरवठादारांची इसारा रक्कम (EMD) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक आठवड्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल.

१५. सदर दरपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळ www.ssampsp.org वर प्रसिद्ध करण्यात आले आहे. इच्छूक पुरवठादार सदर संकेस्थळाला भेट देऊन आवश्यक ती माहिती प्राप्त करून घेऊन विहित मुदतीच्या आत त्यांचे दरपत्रक या कार्यालयास सादर करू शकतील.

१६. या कार्यालयातील दैनंदिन साफसफाईकरिता मागविण्यात आलेली दरपत्रके कोणतेही कारण न देता कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके रद्द करण्याचे अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना आहेत.

१७. तसेच निवड करण्यात येणाऱ्या पुरवठादाराची सेवा समाधानकारक नसल्यास त्याचा सेवाकरार कोणतेही कारण न देता केव्हाही रद्द करण्याचा अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना राहील.

तथापि,आपणांस कळविण्यात येते की, आपले दरपत्रक दि.२१/०१/२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात या कार्यालयास सादर करण्यात यावे.

(राहूल द्विवेदी, भा.प्र.से.)
राज्य प्रकल्प संचालक,
म.प्रा.शि.प., मुंबई.